| | | |
|---|---|---|
| | # आरोग्य विभाग<br>## जिल्हा परिषद,गडचिरोली | |


| | | |
|---|---|---|
| कार्यालय :- जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग,जिल्हा परिषद,गडचिरोली | दुरध्वनी क्रमांक:- 07132-2273 | Website: http://arogya:maharashtra.gov.in<br>Email: dho_gad@rediffmail.com |
| आरोग्य सेवा | जा.क्रमांक/जिपग/आरोग्य/स्था-1/जाहिरात/ 2330 /2026<br>दिनांक: 05/05/2026 | |


प्रति,

**मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,गडचिरोली.**

**विषय:-** प्राथमिक आरोग्य केंद्र व पथक येथे वैद्यकिय अधिकारी गट-अ/ब च्या रिक्त पदांवर MBBS/BAMS अहर्ताधारक उमेदवार कंत्राटी तत्वावर भरण्याकरीता जाहिरात संकेस्थळावर प्रकाशित करण्याबाबत.

उपरोक्त विषयान्वये जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,गडचिरोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्र, व पथक स्तरावर रिक्त असलेल्या वैद्यकिय अधिकारी गट-अ/ब च्या रिक्त पदावर MBBS/BAMS पदावर अर्हताधारक उमेदवारांमधुन भेट मुलाखती द्वारे कंत्राटी स्वरुपात पदभरती करावयाची आहे. याबाबतची जाहिरात जिल्हा परिषद, गडचिरोली कार्यालयाच्या संकेस्थळावर प्रकाशित करण्यात यावी हि विनंती.

सहपत्र:- 1) अर्जाचा नमुना
2) जाहिरात.

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद,गडचिरोली

**प्रतिलिपी:-** माहितीस्तव सविनय सादर.

1) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,गडचिरोली.
2) मा.उपसंचालक आरोग्य सेवा, नागपुर मंडळ, नागपुर.

Scanned with OKEN Scanner

# जाहिरात

## आरोग्य विभाग,जिल्हा परिषद,गडचिरोली,

**वॉक इन इंटरव्ह्यू व्दारे प्राथमिक आरोग्य केंद्र येथील वैद्यकीय अधिकारी यांची कंत्राटी पध्दतीने रिक्त पदे भरण्याबाबत थेट मुलाखत**

मा. अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यांत आलेल्या निवड समितीव्दारे जिल्हांतर्गत सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत ( प्राथमिक आरोग्य केंद्रात) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ व ब या संवर्गातील रिक्त पदे नियमित/सरळसेवेने/बंधपत्रीत वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होई पर्यंत कंत्राटी पध्दतीने एम.बी.बी.एस (M.B.B.S) अर्हताधारकामधून प्राधान्याने भरावयाची आहे. त्यानंतरही सदर पदे रिक्त असल्यास, ती पदे B.A.M.S अर्हताधारकामधून त्या ठिकाणी नियमित/सरळसेवेने/बंधपत्रीत अथवा कंत्राटी एम.बी.बी. एस (M.B.B.S) अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी मिळेपर्यंत किंवा ११ महिन्याचा कालावधी यापैकी जे अगोदर घडेल तेवढ्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने भरावयाची आहेत.

तरी इच्छुक एम.बी.बी.एस आणि बी.ए.एम.एस अर्हताधाकरकांनी जिल्हाधिकारी कार्यालय गडचिरोली येथे सर्व प्रमाणपत्रांचे मुळ प्रती सह अर्जाच्या विहित नमुन्यासह **दिनांक ११ मे २०२६ ला सकाळी ११.०० वाजता** उपस्थीत राहावे. सदर पदासाठी अर्जाचा नमूना www.zpgadchiroli.org या कार्यालयीन अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**पदांचे विवरण** :- वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र व पथक

अ) एम.बी.बी.एस पदाकरिता आदिवासी दुर्गम भागात रु. ८०,०००/- व इतर भागात रु. ७५,०००/- एवढे मानधन राहील.

क) बी.ए.एम.एस पदाकरिता आदिवासी दुर्गम भागात रु. ४५,०००/- व इतर भागात रु.४०,०००/- एवढे मानधन राहील.

**शैक्षणिक अर्हता :- १. एम.बी.बी.एस**
**२. बी.ए.एम.एस**

**अटी व शर्ती :-**

१. सदर तात्पुरती नियुक्ति केवळ ११ महिन्यासाठी किंवा सदर पदावर नियमित/सरळसेवेने/बंधपत्रीत वैद्यकीय अधिकारी किंवा कंत्राटी एमबीबीएस वै.अ उपलब्ध होईल त्या दिनांकापर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तो पर्यंत अमलात राहील. त्यानंतर सदर नियुक्त्या आपोआप संपुष्टात येईल.

२.सदर केवळ तात्पुरत्या स्वरुपात नेमणूका दिलेल्या कंत्राटी वैद्यकीय अधिकारी याना वार्षिक वेतन वाढ अनुज्ञेय असणार नाही.

३.कंत्राटी कर्मचारी हे नियमित कर्मचा-यांप्रमाणे कोणतेही फायदे मिळविण्यांस पात्र असणार नाही.

४. नियमित वैद्यकीय अधिका-यां सारखे वेतन देण्यांत येणार नाही. म.ना.से (रजा) नियम लागू राहणार नाही.

५. सदर कंत्राटी वैद्यकीय अधिका-यांना म.ना.से(वर्तणूक) नियम १९७९ मधील तरतूदी लागू होतील.

६.सदर कंत्राटी वैद्यकीय अधिका-यांना सेवा काळात सेवामुक्त व्हायचे असल्यास त्यांना एक महिन्याची नोटीस किंवा एक महिन्याचे वेतन भरुन कार्यमुक्त होता येईल.

७. कंत्राटी वैद्यकीय अधिका-यांची सेवा खालील कारणास्तव समाधारकारक नसल्यास कोणत्याही

Scanned with OKEN Scanner

क्षणी त्यांची कंत्राटी सेवा पूर्व सूचना न देता समाप्त करण्यांत येतील.

(अ) दोन दिवसापेक्षा जास्त कालावधीसाठी बिनापरवानगीने गैरहजर.

(ब) कामामध्ये निष्काळजीपणा

(क) बायोमेट्रिक प्रणालीवर हजेरी न लावणे

(ड) कामकाज अकार्यक्षम असणे/सेवेची कर्तव्ये व जवाबदा-या कटाक्षाने न पाळणे

(इ) गैरवर्तन / गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास येणे

(फ) कार्यरत पदावर नियमित/सरळसेवेने/बंधपत्रीत वैद्यकीय अधिका-यांची नियुक्ति झाल्यास.

८. अर्ज करणा-या उमेदवाराचे वय ५८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

९. निवड झालेल्या वैद्यकीय अधिका-यांनी मुख्यालय राहणे बंधनकारक असेल, तसेच बॉयोमेट्रिक हजेरी प्रणालीवर हजेरी लावणे अनिवाय राहील.

१०.नियमित वैद्यकीय अधिकारी उपलब्ध झाल्यानंतर कंत्राटी पध्दतीवर नियुक्त केलेल्या वैद्यकीय अधिका-यांची सेवा समाप्त करताना जो वैद्यकीय अधिकारी शेवटी रुजू झालेला आहे त्याची सेवा प्रथम समाप्त करण्यांत येईल.

११. या सेवा कंत्राटी पध्दतीच्या असल्याने त्या बाबत कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.

खालील वैद्यकीय अधिकारी कंत्राटी वैद्यकीय अधिकारी पदासाठी अर्ज करता येणार नाही.

(अ) कंत्राटी म्हणून नियुक्ती मिळाल्यानंतर कालावधी पूर्ण होण्यापूर्वी परवानगी न घेता गैरहजर असलेले व सोडून गेलेले वैद्यकीय अधिकारी

(ब) शिस्तभंगाच्या कारणास्तव सेवा समाप्त केलेले वैद्यकीय अधिकारी.

(क) अनाधिकृत गैरहजर असलेले व शासन सेवेतून काढून टाकलेले व संपामध्ये भाग घेतलेले वैद्यकीय अधिकारी.

(ड) सद्या सेवेत असलेले आणि राजीनामा आदेश नसलेले वैद्यकीय अधिकारी.

स्वा/-

सदस्य सचिव तथा जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद,गडचिरोली

Scanned with OKEN Scanner

# जाहिरात

## आरोग्य विभाग,जिल्हा परिषद,गडचिरोली

**वॉक ईन ईटरव्हिव (थेट मुलाखत) व्दारे कंत्राटी पध्दतीने वैद्यकीय अधिकारी पदे भरण्याबाबत**

जिल्हा निवड समिती मार्फत प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी, गट-अ/गट-ब या रिक्तपदांवर एम.बी.बी.एस./बी.ए.एम.एस.अहर्ताधारक उमेदवारामधुन कंत्राटी पध्दतीने मुलाखती व्दारे (Walk-in-interview) भरण्यासाठी शासनाकडून निर्देश प्राप्त आहेत. सदर पदासाठी लागणारी अहर्ता,अटी व शर्ती तसेच अर्जाचा नमूना www.zpgadchiroli.org या कार्यालयीन अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. उमेदवारांनी सदर अर्ज डाऊनलोड करुन संपूर्ण भरलेला अर्ज आवश्यक सर्व प्रमाणपत्र मुळ प्रतीसह जिल्हाधिकारी, कार्यालय गडचिरोली येथे **दिनांक ११ मे २०२६ सकाळी ११.०० वाजता** उपस्थीत राहावे.

टिपः- प्रत्येक महिण्याच्या दुस-या व चौथा सोमवारी (Walk-in-interview) घेण्यात येतील.

स्वा/-
सदस्य सचिव तथा जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद,गडचिरोली

Scanned with OKEN Scanner

| पासपोर्ट साईझ फोटो लावावा |
|---|

प्रति,

मा.जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद,गडचिरोली.

विषय :- एम.बी.बी.एस/बि.ए.एम.एस वैदयकीय अधिकारी, वर्गः- १ व २ या पदावर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती मिळणे बाबत विनंती अर्ज

अर्जदाराचे पुर्ण नांव :.........................................

पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता :.........................................
.........................................

दुरध्वनी क्र./मोबाईल क्र. :.........................................

स्वतःचा E-mail ID :.........................................

रजिस्ट्रेशन क्रमांक एम.बी.बी.एस——————बी.ए.एम.एस ——————

जन्मतारीख :.........................................

जाहिरातीच्या दिनांकास वय : वर्षे............ महिने ............ दिवस ........

अनूभव असल्यास पदाचे नाव :.........................

कार्यालयाचे नांव :....................................................

**शैक्षणिक अहर्ता –**

| पात्रता परिक्षेचे नांव | विद्यापिठाचे नांव | अंतिम वर्षाचे गुण | | टक्केवारी | उत्तीर्ण वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| | | एकूण गुण | मिळालेले गुण | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

सादर करावयाचे कागदपत्रे (छायांकित प्रत)
:- वयाचा दाखला, शैक्षणिक अहर्तेचे प्रमाणपत्र, आंतरवासिय प्रमाणपत्र, नोंदणी प्रमाणपत्र, पदवी, प्रमाणपत्र, पदवी प्रमाणपत्र अंतिम वर्ष गुणपत्रीका, अनुभव प्रमाणपत्र, पदव्युत्तर अहर्ता असल्यास नोंदणी प्रमाणत्र.

दिनांक :

स्थळ : उमेदवाराची स्वाक्षरी



Scanned with OKEN Scanner